# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागून असलेल्या संरक्षण भिंतीबाबत

**(१) ३०९७ (०३-०६-२०२०) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५५२ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागून असलेली संरक्षक भिंतीबाबतचा प्रश्न विधानपरिषद सभागृहात उपस्थित करण्यात आला असता मा.नगरविकास मंत्री यांनी सदर संरक्षण भिंतीची पाहणी करण्यात येईल असे आश्वासन सभागृहाला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षे होऊनही मा.नगरविकास मंत्र्यांनी संरक्षण भिंतीची पाहणी केली नसून संरक्षण भिंतीच्या प्रश्नाकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थळ पहाणी करुन अहवाल सादर करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना देण्यात आलेल्या सूचनेनुसार अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नगरविकास विभागाकडून दिनांक १२/०२/२०२० रोजीच्या पत्राव्दारे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना संरक्षण भिंतीची पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. या सूचनेनुसार एमएमआरडीएची अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण यांच्या अधिकाऱ्यांसह दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी संयुक्त पाहणी करण्यात आली असून त्यासंदर्भातील अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे.
(४) सदरचा भाग हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या हद्दीत येत नसून, तो मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण (MAIL) यांच्या हद्दीतील आहे व तेथे विमानतळ प्राधिकरणाची दगडाची संरक्षण भिंत अस्तित्वात असल्याचे स्थळ पाहणी अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील ४०० कोटीच्या चटईक्षेत्रफळाचे सर्वाधिकार उपमुख्य अभियंता यांचे प्रदान करण्यात आल्याबाबत

**(२) ३७४५ (०३-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सुमारे ४०० ते ५०० कोटी किंमतीच्या चटई क्षेत्रफळाच्या वितरणाचे सर्वाधिकार उपमुख्य अभियंता रामा मिटकर यांच्या समितीला प्रदान करण्याचा निर्णय मा.गृहनिर्माण मंत्री यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चटईक्षेत्रफळ वितरणासोबत शिथिलता देण्याचे अधिकारही या समितीला देऊन थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारालाच आव्हान देण्यात आले आहे, तसेच म्हाडा उपाध्यक्षांकडे असलेले अंतिम अधिकार उपमुख्य अभियंत्याकडे सुपूर्द करण्यात आल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात समांतर यंत्रणा उभी राहणार आहे काय,

(३) असल्यास, झोपडीवासियांना ३१ चौरस फुटाचा लाभ मिळणार असल्याचे दाखविण्यात आले असले तरी, फंजीवल चटई क्षेत्रफळ व इतर शिथिलता लक्षात घेता विकासकांना ४०० ते ५०० कोटीचे चटई क्षेत्रफळ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१)** : (१) व (२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजुरी दिलेल्या आणि बांधकाम सुरु असलेलया २६९ चौ.फूट आकारमानाच्या पुनर्वसन सदनिका ३०० चौ.फूटात रुपांतरीत करण्याबाबतची सर्व प्रकरणे कालबध्दरित्या निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के मधील तरतुदीस अनुसरुन उपमुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १९/०३/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदरचा निर्णय हा प्रकरणे कालबध्दरित्या निकाली काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेला असल्याने प्राधिकरणात समांतर यंत्रणा उभी राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सदनिकांचे आकारमान वाढविण्याबाबत

**(३) ४११२ (१७-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील (झोपुप्रा) सदनिकांचे आकारमान २६९ चौरस फुटावरुन ३०० चौरस फूट करताना संबंधित प्रकरणावर निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र कक्ष गठीत करण्यासंदर्भात शासनाने दिनांक १९ मार्च, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे व पुन्हा दिनांक १३ मे, २०२० रोजी आणखी एक शासन निर्णय निर्गमित करुन त्याव्दारे विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (डीसीआर) नुसार परवानगी व आवश्यक त्या शिथिलता तसेच वाढीव चटई क्षेत्रासहीत (एफएसआय) सुधारणा, अंदाजपत्रक व आराखडे मंजूर करण्याचे अधिकार सदर स्वतंत्र कक्षास देण्यात येत असल्याचे निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयांचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच मुळात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण गठीत करताना त्याला स्वायत्त प्राधिकरणाचा दर्जा देण्यासंबंधीचा निर्णय विधानमंडळाने घेतलेला असताना अशाप्रकारे उपरोक्त शासकीय निर्णयाव्दारे स्वतंत्र कक्ष गठीत करुन त्या स्वतंत्र कक्षाला निर्णय घेण्याचे अधिकार देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सदनिकांचे आकारमान २६९ चौरस फुटावरुन ३०० चौरस फूट करताना स्वतंत्र कक्ष गठीत करण्याचा बेकायदेशीर निर्णय रद्द करण्यात यावे अशा आशयाचे मागणीचे एक पत्र मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजुरी दिलेल्या आणि बांधकाम सुरु असलेल्या २६९ चौ.फूट आकारमानाच्या पुनर्वसन सदनिका ३०० चौ.फूटात रुपांतरित करण्याबातची सर्व प्रकरणे कालबध्दरित्या निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के मधील तरतुदीस अनुसरुन स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १९/०३/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदरचा निर्णय हा प्रकरणे कालबध्दरित्या निकाली काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदरहू स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के मधील तरतुदीस अनुसरुन घेण्यात आला असल्याने तो बेकायदेशीर ठरत नाही. त्यामुळे सदरचा निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४) ४१७६ (१७-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत १६ हजार उपकरप्राप्त इमारती असून त्यापैकी ९० टक्के इमारती या मोडकळीस आल्या असून पंतप्रधान आवास योजनेतील इमारतींही धोकादायक अवस्थेत असल्यामुळे पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर म्हाडाने यंदाही मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण करुन १८ अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर केल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या अखत्यारीतील सदर धोकादायक, अतिधोकादायक इमारतींची दुरुस्ती करण्याकरीता म्हाडाकडे निधीची कमतरता असल्याने म्हाडास रूपये १०० कोटी देण्याची मागणी म्हाडाच्या सभापती यांनी मा.वित्त मंत्री महोदयांकडे दिनांक १६ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या सर्वेक्षणानुसार अतिधोकादायक इमारतींमध्ये ३१७ निवासी व २२३ अनिवासी भाडेकरूंचा समावेश असल्यामुळे सदर मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती आणि पंतप्रधान आवास योजनेतील इमारतींची दुरुस्ती करण्याकरीता आवश्यक असलेला निधी म्हाडास उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१४-१२-२०२१) :** (१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या प्राप्त अहवालानुसार मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीचे सर्वेक्षण सन २०२० मध्ये केले होते. त्यामध्ये एकूण १८ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक आढळलेल्या होत्या.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदरहू उपप्रश्नात नमूद केलेल्या इमारती ह्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गतल्या नसून पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून सन १९८९ ते १९९५ दरम्यान पुर्नबांधणी करण्यात आल्या आहेत. सदरहू इमारतींची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही भाडेकरु/रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची आहे. तथापि, बऱ्याचशा इमारतीतील भाडेकरु/रहिवाश्यांनी सहकारी गृहनिर्माण संस्था अद्याप स्थापन केलेल्या नाहीत. तसेच ह्या इमारतींची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती भाडेकरु/रहिवाश्यांनी न केल्यामुळे काही इमारतींना दुरुस्तीची आवश्यकता होती. त्यानुसार शासनाने दिनांक २८/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी प्रतिवर्षी रुपये २५ कोटी याप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता एकूण रुपये १२५ कोटी म्हाडा अर्थसंकल्पात तरतूद करुन देण्यास मान्यता दिली आहे. मुंबई इमारत दुरुस्ती

व पुनर्रचना मंडळासाठी रुपये १२५ कोटीपैकी ९० कोटी निधी पीएमजीपी अंतर्गत बांधलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी देण्यात आला होता.यापैकी आतापर्यंत सुमारे रुपये ७६ कोटी खर्च करण्यात आलेला आहे व आवश्यकतेनुसार इतर इमारतींची दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-ठाणे शहरातील मेट्रो प्रकल्पाच्या कामांबाबत

**(५) ४३४५ (१४-०९-२०२०) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-ठाणे शहरात मेट्रो प्रकल्पांची लॉकडाऊनमुळे बंद झालेली कामे काही कालावधीनंतर ती पुन्हा सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लॉकडाऊनच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये दिनांक १० मे, २०२० पर्यंत मेट्रोच्या कामात किती प्रगती झाली व सदर काम करते वेळी कोणत्या अडचणी आल्या आहेत तसेच मेट्रो प्रकल्पांचे काम पूर्ण होण्याचे नियोजित वेळापत्रक तयार करण्यात आले आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे. दिनांक २३ एप्रिल, २०२० पासून कामास सुरुवात करण्यात आली आहे.
(२) अ) लॉकडॉऊनच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये मेट्रोचे कामामध्ये झालेली प्रगती खालीलप्रमाणे: (दिनांक १० मे, २०२० पर्यंत)

मेट्रो मार्ग २अ-०.६२ टक्के ; मेट्रो मार्ग-७-०.३५ टक्के ; मेट्रो मार्ग ६-०.२ टक्के ; मेट्रो मार्ग २ब-लक्षणीय प्रगती नाही ; मेट्रो मार्ग ४, ४अ व ५- अनुक्रमे १.७१ टक्के, १.५ टक्के, २.६ टक्के ; मेट्रो मार्ग ९ व ७अ-१५ पाईल्स पूर्ण झाल्या आहेत. सर्वेक्षण व भूपरिक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

ब) काम करताना आलेल्या अडचणी : मजूर/ कामगार स्थलांतरणामुळे कामगांराची/ यंत्रचालकांची कमतरता, कामाचे ठिकाणी येण्या-जाण्यास होणारी अडचण, कर्मचाऱ्यांच्या कोविड चाचण्या पॉझिटिव्ह आल्या, बांधकाम साहित्याचा तुटवडा, त्यांच्या वाहतुकीस होणारा प्रतिबंध, कत्राटदारांकडील मर्यादित अधिकारी/कर्मचारी संख्या यामुळे प्रकल्पांच्या कार्यान्वयनावर प्रतिबंध आले आहेत.

कोविड-१९ नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने मेट्रो प्रकल्पांच्या स्थापत्य कामांची मुदत ३ ते ६ महिन्यापर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर प्रकल्पांचे नियोजित वेळापत्रक MMRDA कडून तयार करण्यात आले आहे. तसेच कंत्राटदाराच्या वित्तीय कार्यक्षमतेवर परिणाम होऊ नये यासाठी, कंत्राटदाराने विनंती केल्यास कंत्राटदाराचे सदर प्रकरणी ज्या प्रमाणात प्रकल्पाचे काम पूर्ण झाले, त्यांच्या समप्रमाणात अनामत रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येणार आहे. एमएमआरडीए मार्फत मेट्रो कामासाठी बांधकाम साहित्य व यंत्रसामग्री पुरवणाऱ्या आस्थापणा चालू करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच कंत्राटदाराला कामगार पुरवण्यासाठी शासनातर्फे रेल्वेला अधिक डब्बे जोडण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई व महाड येथील इमारत दुर्घटनांमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसांस आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(६) ४९४० (१३-११-२०२०) श्री.प्रसाद लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथे दिनांक २४ ऑगस्ट, २०२० रोजी तारिक गार्डन ही ५ मजल्यांची इमारत कोसळून १६ जणांचा झालेला मृत्यू, मुंबईतील नागपाडा येथील शुक्ला स्ट्रीट वरील आयेशा कंपाऊंडमधील मिश्रा मॅन्शन इमारतीचा भाग दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी कोसळून त्यामध्ये २

जणांचा मृत्यू, डोंगरी (मुंबई) येथे दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजी डॉ.महेश्वरी मार्गावरील रझा चेंबर या इमारतीचा भाग कोसळून एका महिलेचा मृत्यू तसेच भिवंडी (जि.ठाणे) येथे दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजी जिलानी ही इमारत कोसळून ४१ नागरिकांचा मृत्यू अशा सर्व दुर्घटनांमध्ये एकूण ६० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती विना परवाना बांधण्यात येणे, इमारतीचे मालक व भोगवटधारकांमार्फत इमारत सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी उचलण्यात न येणे, महानगरपालिकेच्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून देखील दुर्लक्ष करण्यात येणे तसेच शासन निर्देशानुसार धोकादायक व अतिधोकादायक इमारतींना नोटीस देऊन त्याची सी-१, सी-२ अशी वर्गवारी करणे आवश्यक असूनही त्याची वर्गवारी न होणे इत्यादी बाबी इमारत कोसळण्यास कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत आतापर्यंत किती मृत्यूमूखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना व गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींना वितरीत करण्यात आली आहे तसेच या दुर्घटनेमुळे बेघर झालेल्या लोकांनी मागणी करुनही त्यांच्या घरांची पर्यायी व्यवस्था शासनामार्फत करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुर्घटनाग्रस्त इमारतींचे बांधकाम व्यावसायिक, वास्तुविशारद (Architecture) व अन्य संबंधितांविरुध्द कारवाई करुन भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली वा येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१२-२०२१) :** (१) महाड नगरपरिषद हद्दीतील तारिक गार्डन इमारत दुर्घटनेत १६ जणांचा, मुंबई महानगरपालिका हद्दीतील मिश्रा मेन्शन इमारत दुर्घटनेत २ जणांचा व रझ्झाक चेंबर इमारत दुर्घटनेत १ जणाचा तर भिवंडी महानगरपालिका हद्दीतील जिलानी इमारत दुर्घटनेत ३८ जणांचा मृत्यू झाला, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) महानगरपालिका व नगरपरिषद हद्दीमधील जुन्या इमारतींचे पावसाळ्यापुर्वी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार धोकादायक व अतिधोकादायक इमारती असे वर्गीकरण करण्यात येत असल्याचे संबंधित महानगरपालिका/नगरपरिषद यांनी कळविले आहे.

- महाड येथील तारिक गार्डन इमारत दुर्घटनेतील १६ मयत यांच्या नातेवाईकांना प्रत्येकी रुपये ४०,०००/- अशी एकूण रुपये ६४ लक्ष वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच, मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रुपये १ लक्ष प्रमाणे १६ लक्ष वाटप करण्यात आलेले आहेत.
- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील जिलाणी इमारत दुर्घटनेमधील मृत व्यक्तींच्या वारसांना व जखमींना आर्थिक मदत देण्यात आली असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
- महाड येथील तारिक गार्डन इमारत दुर्घटना प्रकरणी जागा मालक, विकासक, वास्तुविशारद, तत्कालीन मुख्याधिकारी व संबंधित अभियंता या सर्वांवर महाड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल गुन्हयाच्या तपासात ८ आरोपी निष्पन्न झाले असून यापैकी ४ आरोपींवर मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. इतर आरोपी यांच्यावर पुरावा उपलब्ध करुन दोषारोप पत्र दाखल करण्याबाबत मा.न्यायालयाची परवानगी मिळाली असून गुन्हयाचा तपास पुढे सुरु असल्याचे पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने कळविले आहे.
- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील जिलानी इमारत दुर्घटनेच्या अनुषंगाने संबंधित सहायक आयुक्त व शहानिशा अधिकारी यांना निलंबित केले असून सदर घर मालक यांच्यावर नारपोली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील मिश्रा मॅन्शन व रझ्झाक चेंबर या इमारती म्हाडाच्या उपकर प्राप्त इमारती असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## अनधिकृत ले आऊट, बांधकामे अधिकृत करण्यासाठीचा गुंठेवारी योजनेला मुदतवाढ देण्याच्या निर्णयाबाबत

**(७) ८५६९ (१५-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनधिकृत ले आऊट, बांधकामे अधिकृत करण्यासाठीचा गुंठेवारी योजनेला मुदतवाढ देण्याचा शासनाच्या निर्णयावरुन संभ्रम निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिनियमामुळे राज्यातील बरेच गुंठेवारी क्षेत्र नियमित असले तरी अद्यापही काही क्षेत्राचे नियमितीकरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी विशेष बाब म्हणून गुंठेवारी योजना लागू करण्यात आली, परंतु या योजनेला मुदतवाढ दिल्यास कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१) गुंठेवारी योजनेला मुदतवाढ देण्याच्या निर्णयावरून संभ्रम झाल्याची बाब निदर्शनास येत नाही.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे व श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ मध्ये शासनाने दिनांक १२ मार्च, २०२१ रोजी सुधारणा केली असून त्यामध्ये दिनांक ३१/१२/२०२० रोजी अस्तित्वात असलेले गुंठेवारी विकास नियमाधीन करणे व त्याची श्रेणीवाढ करणेबाबत तरतूद केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी नागरी क्षेत्रात संबंधित नियोजन प्राधिकरणाने तर ग्रामीण क्षेत्रात संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून होणे अपेक्षित आहे.

(२) अद्यापही काही क्षेत्राचे नियमितीकरण प्रलंबित आहे, हे खरे आहे. कारण संबंधित जमीन मालकांनी नियमितीकरणाचे प्रस्ताव नियोजन प्राधिकरणास सादर केल्यानंतर नियमितीकरणाची कार्यवाही सुरु होऊ शकते.
(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे व श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मध्ये दिनांक १२ मार्च, २०२१ रोजी केलेल्या सुधारणेमध्ये दिनांक ०१/०१/२००१ ऐवजी दिनांक ३१/१२/२०२० रोजी अस्तित्वात असलेले गुंठेवारी विकास नियमाधीन करणे व त्याची श्रेणीवाढ करणेबाबत तरतूद केली आहे. उक्त सुधारणेत केवळ नियमितीकरणाचा दिनांक बदलला असल्याने कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता निर्माण होत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम नगरपरिषद व औरंगाबाद महानगरपालिकांतर्गत गुंठेवारी नियमित करण्याबाबत

**(८) ८५९० (११-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम नगरपरिषद व औरंगाबाद महानगरपालिकेत अनेक गुंठेवारीचे प्रकरणे मंजूर करण्यात आली असून उपरोक्त शहरातील सर्व अनधिकृत वसाहती गुंठेवारी वसाहती म्हणून नियमित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी प्रशासक, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गुंठेवारी वसाहतीमधून निवडून आलेल्या नगरसेवकांना त्यांचा विकास निधी या वसाहतीमध्ये सेवासुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता खर्च करता येत नसल्यामुळे औरंगाबाद शहरातील गुंठेवारीच्या वाढत्या वसाहती व लोकसंख्या विचारात घेता महानगरपालिकेने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंतच्या वसाहती नियमित करण्यासाठी सर्वसाधारण सभेत मंजूर केलेल्या ठरावानुसार शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतच्या गुंठेवारीतील मालमता नियमित करण्याबाबत मा.मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत मा.मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाचे रुपांतर विधेयकात झाले असूनही त्याबाबतचा शासन आदेश अद्याप निर्गमित केला नसल्याने उपरोक्त मालमता नियमित करण्याची कार्यवाही थांबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने गुंठेवारी प्रकरणामधील अनेक प्रकरणे बेकायदेशिररित्या सर्व नियमांचे उल्लघन करुन मंजूर करण्यात आल्यामुळे लोकप्रतिनिधींनी विधानपरिषदेत उक्त बाब विविध संसदीय आयुधांव्दारे उपस्थित करूनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१२-२०२१)** : (१) अशा स्वरुपाची मागणी लोकप्रतिनिधींनी प्रशासक, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

(२) दिनांक ०६/०१/२०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये, दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतचे गुंठेवारी विकास नियमाधीन करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

"महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१" या अधिनियमात सुधारणा करण्यात आली असून या अधिनियमाच्या कलम ३(१) आणि कलम ३(१) चे परंतुक (क) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतचा गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी पात्र आहे. सदर अधिनियम दिनांक १२/०३/२०२१ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे.

तसेच दिनांक २५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संचालक, नगर रचना, पुणे यांना सर्व नियोजन प्राधिकरणे/विशेष नियोजन प्राधिकरणे/जिल्हाधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी अवगत करण्याविषयी कळविण्यात आले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथे म्हाडा प्रकल्पांतर्गत सदनिका विकत घेतलेल्या नागरिकांना मालकी हक्क प्रदान करण्याबाबत

**(९) ८८७२ (१८-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे म्हाडा प्रकल्पांतर्गत सदनिका विकत घेतलेल्या नागरिकांना मालकी हक्क नाकारण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाला अभिहस्तांतरण झालेल्या इमारतींच्या प्रकल्पात सहभागी होता येत नसल्यामुळे म्हाडाकडून त्रिपक्षीय करारनामा करण्याचे नियोजित असून म्हाडा प्रकल्पांतर्गत इमारतींना मालकी हक्क (कन्व्हेयन्स) न देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने रहिवाश्यांमध्ये सर्वत्र नाराजी पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने घेतल्या निर्णयाचा फेरविचार करून म्हाडा इमारतीतील सदनिका विकत घेतलेल्या नागरिकांना मालकी हक्क देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) असा निर्णय घेतलेला नाही.

तथापि, म्हाडा वसाहतीतील इमारतींचा पुनर्विकाससंदर्भात केवळ संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये व्दिपक्षीय करार झालेले असल्याने त्यामधील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास म्हाडाकडून कोणताही हस्तक्षेप करता येत नाही, परिणामी असे पुनर्विकास प्रकल्प वर्षानुवर्षे रखडतात. तसेच संबंधित रहिवाश्यांच्या भाड्यासंदर्भातील तसेच अन्य तक्रारींचे निवारणही योग्य रीतीने होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने दिनांक १६/०३/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये म्हाडाअंतर्गत वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासासाठी म्हाडा, संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला-बुलढाणा तसेच वाशिम जिल्हयातील कारंजा नगरपरिषदेच्या सुधारित नवीन विकास आराखड्याबाबत

**(१०) ८९३० (१५-०७-२०२१) :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला-बुलढाणा तसेच वाशिम जिल्हयातील कारंजा नगरपरिषदेच्या विकास आराखड्याची मुदत संपल्यानंतर सुधारित नवीन विकास आराखडे व ELU बनविण्याची प्रक्रिया कोविड-१९ ह्या साथीच्या काळात सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या विविध कलमान्वये तसेच सुचविलेल्या सुधारणांसहित सुधारित विकास आराखड्याची प्रक्रिया राबविण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सुधारित विकास आराखडा तयार करताना नेमणूक केलेले अधिकारी, संस्था, नियोजन प्राधिकरण हे नागरिकांचे आक्षेप व लोकप्रतिनिधी, नगरसेवक यांनी सुचविलेल्यात सुधारणा विचारात न घेता तसेच त्यांना विश्वासात न घेता मनमानीपणे सुधारित विकास आराखड्याची व ELU ची संपूर्ण प्रक्रिया राबवित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधी व नगरसेवकांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेता मनमानी विकास आराखडा तयार करण्यात आल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेबाबत संशय निर्माण झाला असून जोपर्यंत शासकीय कार्यालयामधील काम करण्याची प्रक्रिया सुव्यवस्थित होत नाही तोपर्यंत उपरोक्त विकास आराखडे व ELU चे काम थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबत भूमिका व प्रतिक्रिया काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) (अ) अकोला-प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाचे कामास सुरुवात करण्यात आलेली नसून प्राथमिक प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(ब) बुलढाणा- नगर परिषद, मलकापूर व नगर परिषद, खामगाव शहराची विकास योजना G.I.S. प्रणालीचे माध्यमातून सुधारित करणेकरीता Stesalit Systems Ltd. या empanelled agency ची निवड झाली असून काम सुरू करणेबाबत त्यांना विभागीय कार्यालयाने कार्यादेश दिलेला आहे. त्यांचेमार्फत E.L.U. तयार करणेचे अनुषंगाने आवश्यक माहिती गोळा करण्याचे काम सुरु आहे.

(क) वाशिम- कारंजा नगर परिषद क्षेत्रासाठी विकास योजनेचा नकाशा शाखा कार्यालयाकडून पत्र क्र. १६१, दिनांक २२/०२/२०१९ अन्वये कारंजा नगर परिषदेस हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सबब, विद्‌यमान वापर नकाशाचे काम व प्रारूप विकास योजना तयार करण्याची प्रक्रिया कोविड-१९ या साथीचे काळात सुरू करण्यात आलेली नाही. प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-२६ अन्वये प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेकरीता अंतिम मुदतवाढ दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत मंजूर असून सदर विकास योजना महाराष्ट्र शासन राजपत्र एक (अ) अमरावती विभागीय पुरवणी मध्ये दिनांक २८/०१/२०२१ ते ०३/०२/२०२१ या कालावधीत पृष्ठ क्र. १ व २ वर प्रसिध्द झालेली आहे. विकास आराखड्‌याची मुदत संपल्यानंतर विकास आराखडा तयार करण्यात आलेला नाही.

(२) नाही.

(३) (अ) अकोला- विद्‌यमान भूवापर नकाशा तयार करण्याचे काम प्राथमिक टप्प्यात असल्याने नागरिकांचे / लोकप्रतिनिधींचे / नगरसेवकांचे आक्षेपांची बाब सद्‌य:स्थितीत लागू नाही, असे संचालक, नगर रचना यांनी दिनांक २९/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(ब) बुलढाणा- नगर परिषद, मलकापूर व नगर परिषद, खामगाव बाबत, विद्‌यमान भूवापर नकाशा तयार करण्याचे काम प्राथमिक टप्प्यात असल्याने नागरिकांचे/ लोकप्रतिनिधींचे / नगरसेवकांचे आक्षेपांची बाब सद्‌य:स्थितीत लागू नाही, असे संचालक, नगर रचना यांनी दिनांक २९/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(क) वाशिम- नगर परिषद, कारंजा यांनी दिनांक ३१/१२/२०२० रोजी ठराव क्र.२१ नुसार सुचविलेले बदल प्रारुप विकास योजना नकाशावर हिरव्या रंगाचे किनारीने दर्शविले आहेत. सदर बदलासह प्रारुप विकास योजना महाराष्ट्र शासन राजपत्र एक (अ) अमरावती विभागीय पुरवणी दिनांक २८/०१/२०२१ ते दिनांक ०३/०२/२०२१ या कालावधीत पृष्ठ क्र.१ व २ वर प्रसिध्द झालेली आहे. सबब, नगर परिषद, कारंजा शहराची दुसरी सुधारित विकास योजना नगर परिषदेच्या सर्वसाधारणसभेने सुचविलेल्या सुधारणा विचारात घेऊनच तयार करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(४) (अ) अकोला- सुधारित विकास योजना तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ ते ३१ मधील तरतुदीचे पालन करुन तयार करण्यात येत आहे.

(ब) बुलढाणा- नगर परिषद, मलकापूर व नगर परिषद, खामगाव बाबत, सुधारित विकास योजना तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ ते ३१ मधील तरतुदीचे पालन करुन तयार करण्यात येत आहे.

(क) वाशिम- कारंजा शहराची प्रारुप विकास योजना प्रसिध्दीनंतर केलेल्या सूचना/हरकतीस उक्त अधिनियमाचे कलम-२८(२) अन्वये दिनांक ०५/०५/२०२१ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त केलेल्या नियोजन समितीने सूचना/हरकत धारकांना प्रत्यक्ष सुनावणी दिली आहे व पुढील कार्यवाही विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने कोविड-१९ विषयक शासनाची मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन समिती व नगर परिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) लागू नाही.

---

## नवी मुंबई येथे सिडकोमार्फत उभारण्यात येणाऱ्या सुसज्ज रुग्णालय व मेडिकल कॉलेजबाबत

**(११) ९२४९ (१५-०७-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरातील १० एकर जागेवर सुसज्ज रुग्णालय व मेडिकल कॉलेज सिडकोमार्फत उभारुन देणार असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालय व मेडीकल कॉलेज उभारण्यासाठी सिडकोमार्फत आकृतिबंध आराखडा तयार करण्यात आला असून नव्याने बांधण्यात येणाऱ्या रुग्णालयात व मेडिकल कॉलेजमध्ये शहरातील गरीब, गरजू नागरिकांना उपचार उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या सदर रुग्णालयाची त्वरित उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१), (२) व (३) नवी मुंबई क्षेत्रात सर्व सेवा सुविधांयुक्त हॉस्पिटल उभारण्याच्या अनुषंगाने सिबीडी बेलापुर सेक्टर-१५अ येथील भुखंडाची निवड सिडकोमार्फ़त करण्यात आली आहे. सदर रुग्णालय “खाजगी-सार्वजनिक-भागिदारी” (पी.पी.पी.) तत्वावर विकसित करण्याच्या अनुषंगाने संभाव्य निविदाकार यांना आमंत्रित करण्यासाठी “प्रस्तावाकरीता स्वारस्य अर्ज” (आर.एफ़.पी.) सिडकोमार्फ़त तयार करण्यात येत असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील झोपडपट्टीवासियांना शासकीय धोरणानुसार पट्टे वाटप करण्याबाबत

**(१२) ९३४१ (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात खाजगी जमिनीवर अतिक्रमण केलेल्या झोपडपट्टीवासियांना शासकीय धोरणानुसार पट्टे वाटप करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या आमसभेत आरक्षणात फेर बदल करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठराव मंजूर होवूनही अद्‌याप पुढील प्रक्रिया सुरु न झाल्याने झोपडपट्टीधारकांना मालकी पट्टयांची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१२-२०२१) :** (१) व (२) शासन निर्णय क्र.नामपा - २०१९/प्र.क्र.३४/नवि-२६, दिनांक ११/०९/२०१९ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील खाजगी जागेवरील अतिक्रमणधारकाचे अतिक्रमण क्षेत्र घोषित झोपडपट्टी म्हणून संबोधले असल्यास अशा खाजगी जमिनीवरील अतिक्रमीत झोपडीपट्टी धारकांना पट्टे वाटप करणेकरीता झोपडपट्टया नियमानुकुल करण्याच्या दृष्टीने उक्त जागा "बेघरांसाठी घरे (Housing For Dishoused)| अथवा "जनतेसाठी घरे "(Public Housing) या प्रयोजनाकरीता नागपूर शहराच्या विकास योजना आराखड्‌यात आरक्षित करणेकरीता नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने दिनांक २०/०१/२०२१ रोजीच्या महासभेत ठराव क्र.३३, प्रभाग क्र. २३ अंतर्गत १) सतनामी नगर कब्रस्तान गल्ली, २) रामा स्टील झोपडपट्टी, स्मॉल फॅक्ट्री ऐरीया या दोन खाजगी स्लम वस्त्या पट्टे वाटप करण्याच्या विषयात समाविष्ट करण्याच्या सुचनेसह मंजूर करण्यात आलेला आहे.

याअनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या उपरोक्त ठरावाचे उपसुचनेमध्ये नमुद स्लम वस्त्या ह्या घोषित अथवा अघोषित झोपडपट्टी यापैकी कोणत्या विभागात समाविष्ट आहेत तथा जागेच्या मालकीबाबत नागपूर महानगरपालिकेच्या स्लम विभागास विचारणा करण्यात आलेली होती. उपसुचनेत नमुद दोन्ही स्लम वस्तींचे नावे स्लम विभागाकडील घोषित व अघोषित झोपडपट्टीच्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याने उक्त दोन्ही स्लम वस्त्याची नावे सदर प्रस्तावात समाविष्ट न करता आयुक्त, नागपूर

महानगरपालिका यांच्याव्दारा दिनांक २१/०६/२०२१ रोजी ठरावानुसार कार्यवाही सुरु केली आहे. त्यानुसार नागरीकांकडून हरकती/सुचना मागविणेस्तव दैनिक वर्तमानपत्र व शासन राजपत्रात दिनांक २२/०६/२०२१ रोजी प्रसिध्द केले. या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेस एकूण ०६ आक्षेप/ सूचना प्राप्त झालेल्या होत्या व त्यांची सुनावणी नागपूर महानगरपालिकेने दिनांक २५/०८/२०२१ रोजी घेतली आहे. सुनावणी दरम्यान आक्षेपकर्ता/सुचनाकर्ता यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने अहवाल तयार करुन फेरबदला संबंधीचा अहवाल शासनास सादर करण्याची प्रक्रिया नागपूर महानगरपालिकास्तरावर सुरु आहे. तसेच महानगरपालिकेच्या सभेतील मंजूर ठरावाच्या आधारे चटई क्षेत्र निर्देशांक धोरणानुसार (TDR Policy) जमीन संपादित करण्याची कार्यवाही नागपूर महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

नागपूर शहरात झोपडपट्टयांनी अतिक्रमित खाजगी जमिनीची संख्या जास्त असल्याने त्यांचे मालकी नुसार असलेले जमीनविषयक सर्व कायदे/नियम/शासन निर्णय यांची अंमलबजावणी बाबतची खात्री करुन तसेच जमिनीसंदर्भात जमीन संपादित करण्याची कार्यवाही नागपूर महानगरपालिका स्तरावर सुरु आहे. नागपूर शहरात झोपडपट्टयांनी अतिक्रमित खाजगी जमिनीची संख्या जास्त असल्याने त्यांचे मालकी नूसार असलेले जमीनविषयक सर्व कायदे/नियम/शासन निर्णय यांची अंमलबजावणीबाबतची खात्री करून, तसेच अशा जमिनीसंदर्भात न्यायालयीन प्रकरणे दाखल असल्यास त्याबाबतची सद्य:स्थिती विचारात घेवून खाजगी जमीन मालकी हक्क निहाय प्राप्त अर्जावर क्रमवारीने शासन निर्णय क्र. एमयुएन-२०१८/प्र.क्र. १९७/नवि-१८, दिनांक १७/११/२०१८ मधील तरतुदीची पूर्तता होत असल्यास शासन मान्यतेने नागपूर महानगरपालिकेच्या स्लम विभागामार्फत पट्टेवाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

(३) वरीलनुसार सदर प्रस्ताव नागपूर महानगरपालिका स्तरावर सुरु असून नागपूर महानगरपालिकेने कायदेशीर कार्यवाहीअंती फेरबदल प्रस्ताव शासनास सादर केल्यास शासनाकडून गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल.

(४) लागू नाही.

---

## नागपूर येथील गोरेवाडा प्राणीसंग्रहालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) ९७५२ (११-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयात १०० कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना केवळ १० कर्मचारी कार्यरत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र वन विकास महामंडळ आणि एक्सेल वल्ड यांनी संयुक्तपणे प्राणी संग्रहालय विकासाची व चालवण्याची जबाबदारी घेतली होती मात्र काही महिन्यापूर्वी एक्सेल वल्ड यांनी करार मोडून जबाबदारी नाकारल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राणी संग्रहालयावर आर्थिक भार होत असल्याने एफडीसीएम प्रतिक्षेत असलेल्या स्थानिक मुलांची नियुक्ती पुढे ढकलण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोरेवाडा प्राणी संग्रहालयात नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन उक्त रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-१२-२०२१) :** (१) नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या व्यवस्थापनासाठी एकूण ४४ पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी २३ पदे सद्यस्थित कार्यरत आहेत. उर्वरित मनुष्यबळ हे आवयकतेनुसार कंत्राटी पध्दतीने सेवा प्राप्त करण्यात येत आहेत.

(२) एफडीसीएम व खाजगी सहयोगी (एस्सेल वर्ल्ड) यांचेकडून त्याचे भागीदारी पोटी सुनिश्चित गुतंवणुक Joint Venture Company मध्ये करणे व त्या गुतंवणुकीतून विकास कामे करणे अपेक्षित होते. त्या नुसार खाजगी यहयोगी यांनी Performance Security ची रक्कम न भरल्याने एफडीसीएम व खाजगी हयोगी (एस्सेल वर्ल्ड) यांचे मधील झालेला करारनामा रद्द करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

प्राणी संग्रहालयासाठी प्रशासकीय निकडीच्या आधारावर आवश्यकतेनुसार कंत्राटी पध्दतीने सेवा प्राप्त करण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथील द्रोणागिरी प्रकल्पाकरीता घालण्यात येणाऱ्या भरावामुळे पुरस्थितीजन्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(१४) ९९९० (१५-०७-२०२१) :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील द्रोणागिरी प्रकल्पाकरीता घालण्यात येणाऱ्या भरावामुळे कुंडे या गावासह इतर गावातील ग्रामस्थांना वेळी-अवेळी पुरस्थितीजन्य परिस्थितीचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने माहिती घेवून सदर गावांत वारंवार निर्माण होणारी पुरस्थिती रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सिडकोमार्फ़त उरण येथील द्रोणागिरी नोडची उभारणी करतांना हायड्रॉलिक परिक्षण व डच पध्दतीनुसार मातीचा भराव करुन होल्डिंग पॉंड (धारण तलाव) ची निर्मिती केली आहे. त्यानुसार पावसाचे पाणी हाय-टाईड वेळी होल्डिंग पॉंड मध्ये साठवले जाते व लो-टाईडच्या वेळी पाईप आऊटलेटमार्फ़त समुद्रात सोडले जाते. या कार्यपध्दतीमुळे कुंडे व आसपासच्या गावात पाणी शिरुन पुरस्थितीजन्य परिस्थिती निर्माण झाली असा निष्कर्ष काढणे संयुक्तिक नाही.

(२) सिडकोने द्रोणागिरी नोडमधील होल्डिंग पॉंड व चॅनलमधील गाळ उपसण्यासाठी MoEF कडे परवानगी मागितली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केईएम रुग्णालय, मुंबई येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची आर्थिक देणी अदा करण्याबाबत

**(१५) १०२२६ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केईएम रुग्णालय, मुंबई येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणी न मिळाल्यामुळे आमरण उपोषण करणार असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केईएममधील शेकडो कर्मचाऱ्यांना गत एक वर्षापासून सेवानिवृत्तीनंतर मिळणारी भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्युएटी, गत वर्षाचा बोनस, पेन्शन इत्यादी काहीही न मिळाल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची उपासमार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीचे सर्व लाभ मिळेपर्यंत मनपा प्रशासनाकडून आर्थिक मदत देण्याची उपाययोजना करुन सेवानिवृत्तीनंतरची सर्व देणी वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१) के.ई.एम. रुग्णालयात कोणत्याही कामगार/कर्मचाऱ्यांनी देणी न मिळाल्यामुळे आमरण उपोषण केल्याचे किंवा करणार असल्याचे निदर्शनास आले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) के.ई.एम. रुग्णालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दावे कार्यान्वित आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ पासून सर्व कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन दावे सॅप कार्यप्रणालीमधून काढण्याची प्रक्रिया सुरु झाली.

तथापि, सदर प्रक्रिया नवीन असल्यामुळे व तांत्रिक अडचणीमुळे दिनांक ०१/११/२०१९ पासून सॅप कार्यप्रणालीमधून निवृत्तीवेतन दावे अपलोड करण्याची प्रक्रिया विहीत वेळेत अपलोड करणे शक्य झाले नाही.

के.ई.एम. रुग्णालयातील अ ते ड संवर्गातील एकूण २०६ कर्मचारी दिनांक ०१/११/२०१९ पासून सेवानिवृत्त झाले. परंतु सद्य:स्थितीत त्यामधील ५९ निवृत्तीवेतन दावे ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीची तसेच सेवाअभिलेखाची लेखा पडताळणी, कामगारांच्या सेवानिवासस्थानाबाबतची थकबाकीची वसुली, कामगारांच्या नामनिर्देशनबाबत अडचणी, गृहकर्जाबाबतची पडताळणी इत्यादी बाबींमुळे प्रलंबित आहेत.

सदर प्रलंबित निवृत्ती वेतनदाव्यांबाबत प्रमुख लेखापाल (निवृत्तीवेतन), मानवसंसाधन विभाग इत्यादी विभागांशी समन्वय साधून निवृत्तीवेतनाच्या अधिदानाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) १०२६० (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागातील ५० टक्के पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने काही वर्षापूर्वी प्रसिध्द केलेल्या अहवालात मुंबईतील एक लाख नागरिकांसाठी अवघे ५४ डॉक्टर उपलब्ध असल्याची माहिती नमूद करण्यात आली असून सद्य:स्थितीत अनेक डॉक्टर सेवानिवृत्त झाल्याने ही संख्या अजून कमी झाल्यामुळे खाजगी रुग्णालयातून भूलतज्ञ बोलवावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिकेतील सर्व रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी व निम्नवैद्यकीय अधिकारी यांची साधारणत: ३०% ते ३५% पदे रिक्त असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये खाजगी रुग्णालयांमधून कोणतेही डॉक्टर्स बोलाविण्यात येत नाहीत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख वैद्यकीय अधीक्षक व खातेप्रमुख यांच्या अखत्यारीतील १६ उपनगरे रुग्णालये व कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अखत्यारीतील विशेष रुग्णालये व प्रसुतीगृहांमधील भूलतज्ञांची नियमित पदावर भूलतज्ञ डॉक्टर्स उपलब्ध होत नसल्याने रुग्णालयनिहाय खाजगी भूलतज्ञ डॉक्टरांचे पॅनल तयार करुन शस्त्रक्रियेवेळी आवश्यकतेनुसार पॅनलवरील डॉक्टरांना बोलाविण्यात येते व शस्त्रक्रियांच्या प्रकारानुसार (मेजर/मायनर) निश्चिती केलेल्या दराने अधिदान करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व रिक्त पदे विविध खात्यांकडून भरली जातात. तसेच रिक्त असलेली पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही नियमानुसार युध्दपातळीवर सुरु आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार खुल्या प्रवर्गाच्या कोट्यातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु असून, मागास प्रवर्गाची पदे पदोन्नतीने भरता येत नसल्याने काही पदे रिक्त आहेत. तसेच रुग्णालयांची निकड लक्षात घेता, वैद्यकीय अधिकारी व निम्नवैद्यकीय कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कार्यालयामधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी मिळण्याबाबत

**(१७) १०२८१ (०८-१२-२०२१) श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कार्यालयामधून वर्ग-१ ते वर्ग-४ प्रवर्गातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी तसेच असे अधिकारी व कर्मचारी मोठ्मोठ्या खाजगी विकासकाकडे उपाध्यक्ष (व्हाईस प्रेसिडेंट), एम.डी. म्हणून कार्यरत असतील अशा अधिकाऱ्यांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे आश्वासन मा.राज्यमंत्री सामान्य प्रशासन महोदयांनी दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दीड वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापपावेतो उक्त अधिकाऱ्यांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली नूसन अशा प्रकारे सदर यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब करणाऱ्या व कंत्राटी पध्दतीने नियुक्त सदर सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासकीय कार्यालयातील अशा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा खंडीत करुन दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची यादी कधीपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२८-१२-२०१२) :** (१) व (२) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालये शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०२१ मधील तरतूदीनुसार आवश्यकतेनुसार विषयनिहाय एमपॅनलमेंट करून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करून घेतात.

मा.राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने माहिती मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून मागविण्यात आली आहे. सदर माहिती व्यापक स्वरूपाची असल्याने कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची शासकीय कार्यालयातील उपस्थिती मर्यादीत केल्यामुळे माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब होत आहे.

(३) शासकीय कार्यालयतील अशा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा त्वरीत खंडीत करून दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णय सध्या शासनाच्या विचाराधीन नाही.

मा.राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाची माहिती व्यापक स्वरूपाची असल्यामुळे माहिती प्राप्त झाल्यानंतर विनाविलंब सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला (जि.अकोला) महानगरपालिकेच्या मालकीच्या लीजवरील उत्तर झोनअंतर्गत भूखंडाची विक्री केल्याबाबत

**(१८) १०२८५ (२०-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) महानगरपालिकेच्या मालकीच्या लीजवरील उत्तर झोनअंतर्गत मणकर्णा प्लॉट व शेलारफैलमधील भूखंडाची विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार तत्कालीन आयुक्त यांनी निदर्शनास आणल्याची घटना माहे सप्टेंबर,२०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाचे क्षेत्रफळ ३ ते ४ हजार चौ.फुट असून बाजार मूल्यानुसार किमान रुपये दोन ते तीन कोटी किंमत असलेला भूखंड सन १९५५ पासून सुरुवातीला रुपये ५ व नंतर रुपये ३० वार्षिक शुल्क जमा करण्याच्या बदल्यात संबंधित रहिवाश्यांना एकूण ३० वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ६६ वर्षांपासून सदर भूखंडावर आलिशान घरे उभारुन राहणाऱ्या रहिवाशांना रेडीरेकनरचे दरही लागू केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१)** : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर भूखंड तत्कालीन नगरपरिषदेने १९६० च्या दशकात नागरिकांना ३० वर्षाचे कालावधीकरीता भाडेपट्ट्याने दिले होते. मात्र त्यानंतर तत्कालीन नगरपरिषद किंवा विद्यमान अकोला महानगरपालिकेने सदर भूखंडाच्या भाडेपट्ट्यास मुदतवाढ दिलेली नाही.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माणकोली, डोंबिवली-मोठागाव-ठाकुर्ली या प्रस्तावित रस्त्यासाठी बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत

**(१९) ४१३५० (०२-०८-२०१८) श्री.रविंद्र फाटक** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी, ठाणे, कल्याण, डोंबिवली परिसरातील जीवघेणी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने माणकोली, डोंबिवली-मोठागाव-ठाकुर्ली असा नवीन रस्ता एमएमआरडीएच्या माध्यमातून प्रस्तावित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नवीन रस्त्याकरीता भूसंपादनाचे काम हाती घेतले आहे, परंतु रस्त्यात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी शासन जमिनीला योग्य बाजारभाव देत नाही तोपर्यंत जमिनीला हात लावू देणार नाही असा निर्धार प्रकल्प बाधित शेतकरी संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार प्रस्तावित प्रलंबित रस्त्याचे काम मार्गी लागण्याकरीता रस्त्यात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१)** : (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) डोंबिवलीकडील मोटागाव येथील प्रकल्प बाधित जमिनीचे भूसंपादन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मोठागाव, ठाकुर्ली ते दुर्गाडी (फेज-३) या भागातील ६.८० कि.मी. लांबीच्या बाह्यवळण रस्त्याकरीता भूसंपादन महानगरपालिकेमार्फत ८३% जमीनमालकांनी हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपात मोबदल्याच्या अनुषंगाने रस्त्याकरीता संमती दिलेली आहे. त्यानुसार त्यांना हस्तांतरणीय विकास हक्क देऊन भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

माणकोली बाजूकडील प्रकल्पबाधित जमिनीचे भूसंपादन ठाणे जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर जमीन भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ते कलम २३(१) प्रमाणे निवाडा जाहीर होऊन खातेदारांना नुकसान भरपाईचा मोबदला अदा करणेत येऊन एकूण जमिनीचे क्षेत्र ७-६२-६३ चा ताबा घेऊन संपादित संस्था (एमएमआरडीए) ला देण्यात आला आहे.

प्राधिकरणाच्या विमानपतन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प या विभागामार्फत पत्र क्र. विझोपुप्र/मोटागाव-माणकोली/२०/२०१९ दिनांक १८/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, ठाणे कार्यालयास सदर जोडरस्त्यात बाधित होणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाच्या नुकसान भरपाईपोटी रक्कम रुपये ३१,३८,९८,५७७/- अदा करण्यात आली आहे.

माणकोली, भिवंडी येथून माणकोली, मोटागाव या जोडरस्त्याचे काम प्राधिकरणाने दिनांक १३/०९/२०१९ पासून हाती घेतले आहे.

---

## राज्यातील विविध गृह प्रकल्पासांठी म्हाडाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) ४७३२७ (०६-०७-२०१९)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या (महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण) अखत्यारितील प्रस्तावित गृह प्रकल्पांसाठी रुपये ३२ हजार कोटींची गरज आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धारावी प्रकल्पासाठी तात्पुरत्या स्वरुपात रुपये ८०० कोटी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला कामगार संघटनेने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्नांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०९-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

म्हाडाच्या मुंबईतील प्रस्तावित विविध योजना पूर्ण करण्यासाठी पुढील ०२ ते ०३ वर्षात अंदाजे रुपये ६२८९१.८८ इतक्या निधीची आवश्यकता आहे, असे म्हाडाने कळविले आहे.

(२) व (३) धारावी पुनर्विकास प्रकल्पास म्हाड प्राधिकरण निधीमधून रुपये २०० कोटी व महाराष्ट्र निवारा निधीमधून रुपये ३०० कोटी शासन निर्णय क्रमांक धापुप्र-२०१८/प्र.क्र. ९०/झोपसु, दिनांक २८/०५/२०१९ व प्राधिकरण ठराव क्र. ६८५९, दिनांक ३१/०५/२०१९ नुसार उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

धारावी प्रकल्पासाठी सदर निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना, म्हाडा मागासवर्गीय संघटना व ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा तसेच, कर्मचारी संघ म्हाडा इ. कामगार संघटनांमार्फत विरोध दर्शविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.